मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सायकल ट्रॅकवर फेरीवाल्यांसह वाहनांचे अतिक्रमण

## स्मार्ट सिटीचा पब्लिक शेअरिंग उपक्रम बासनात : सायकल ट्रॅकवर फेरीवाले, फोर व्हीलर यांचे अतिक्रमण

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्मार्ट सिटी असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेने विविध रस्त्यांवर आठ सायकल ट्रॅक तयार केले आहेत. त्याकरिता कोट्यवधींचा निधी खर्च केला आहे. शहरातील आणखी रस्त्यांवर सायकल ट्रॅक बनवण्यात येत आहे. मात्र, सायकल ट्रॅकवर फेरीवाले, फोर व्हीलर यांचे अतिक्रमण होऊ लागले आहे. त्यामुळे स्वतंत्र व सुरक्षित रस्ता नसल्याने सायकलस्वारांना अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात विविध सायकल ट्रॅक तयार केले आहेत. शहरात आणखी काही सायकल ट्रॅक बनवले जाणार आहेत. त्यावर महापालिका कोट्यवधी रुपये खर्च करू लागली आहे. आतापर्यंत विविध रस्त्यांवर ७५ किलोमीटर अंतराचे सायकल ट्रॅक तयार झाले आहेत. शहरात ४५ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर स्वतंत्रपणे सायकल ट्रक बनवले आहेत. काही ठिकाणी रस्ते अरुंद आहेत. त्या भागात लाल रंगाचे पट्टे मारून सायकल ट्रॅक तयार केले आहेत. हे सायकल ट्रॅक महापालिका आणि स्मार्ट सिटी कंपनीने तयार केले आहेत. शहरातील विविध रस्त्यांवर आठ ठिकाणी ७५ किलोमीटरचे सायकल ट्रॅक तयार केले. त्याशिवाय अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ता विकसित करताना सायकल ट्रॅक देखील बनवला आहे.

शहरात रस्त्यावर बनविलेले सायकल ट्रॅक हे एक सलग नसल्याने अनेक ठिकाणी सायकलस्वारांना अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे. सायकल ट्रॅकवर मध्येच अनेक ठिकाणी झाडे, बैठकीचे बाक, कठडे, डीपी बॉक्स, दिव्यांचे खांब, फोर व्हीलर, टू व्हीलरसह उभी केलेली अन्य वाहने, छोटे फेरीवाले, फळ विक्रेते, दुकान- व्यावसायिकांचे साहित्य, कचऱ्याचे ढीग, नामफलक, तुटलेले चेंबर, उघड्या वीज वाहक केबल, अशा प्रकारचे अतिक्रमण सायकल ट्रॅकवर पाहावयास मिळत आहेत.

दरम्यान, महापालिकेने शहरात बनवलेले सायकल ट्रॅकवर खऱ्या अर्थाने सायकलस्वारांना अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे. सायकल सुरक्षितपणे चालवता येत नाही. त्यामुळे सायकल ट्रॅकवर केलेला कोट्यवधींचा खर्च वाया गेला का? अशी भावना सायकलस्वारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### असे आहेत सायकल ट्रॅक

- सांगवी फाटा ते साई चौक
- नाशिका फाटा ते वाकड
- काळेवाडी फाटा ते एमएम स्कूल
- चिंचवड ते वाल्हेकरवाडी चौक
- केएसबी चौक ते कुदळवाडी
- एम्पायर इस्टेट ते ऑटो क्लस्टर चौक
- भक्ती शक्ती चौक ते रावेत पूल
- पिंपळे सौदागर ते पिंपळे गुरव चौक

### अतिक्रमणावर कारवाई नाही..

**» शहरात सायकल आणि पादचाऱ्यांसाठी महापालिकेने अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ते विकसित केले जात आहे. नागरिकांना पायी चालता यावे, सायकलवर प्रवास करता यावा, याकरिता अर्बन स्ट्रीटने रस्ते विकसित होत आहेत. तसेच जवळच्या अंतरासाठी नागरिकांनी सायकल वापरावी, शहरातील वायू व ध्वनिप्रदूषण कमी होऊन स्वच्छ व शुध्द हवा निर्माण व्हावी, महापालिकेचा प्रयत्न आहे. मात्र, सायकल ट्रॅकवर होणाऱ्या अतिक्रमणांवर कधीच कारवाई होत नाही. सायकल मार्गावरील अडथळे दूर केल्याशिवाय सायकलस्वारांना नीटपणे सायकल चालवता येणार नाही. याकरिता महापालिका अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई कधी करणार, असा प्रश्न निर्माण होत आहे.**

> “ महापालिकेच्या लिनिअर गार्डन मार्गावर सायकल ट्रॅकवर सायकल चालविण्यास गर्दी होत आहे. लहान मुलासह ज्येष्ठ नागरिकांचादेखील प्रतिसाद मिळत आहेत. काही प्रशस्त रस्त्यावर सायकलस्वार दिसून येत आहेत. मात्र, काही सायकल ट्रॅकवर अतिक्रमण व अडथळा आहे. त्या मार्गावरील अतिक्रमणे लवकरच महापालिकेकडून काढण्यात येतील. नागरिकांना सायकल ट्रॅकवरील सर्व अडथळे दूर करून सुरक्षित सायकल चालविण्यासाठी सायकल मार्ग व्यवस्थित केले जातील.
>
> **- बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता, वाहतूक विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# पंजाबी व हरियाणवी मतदारांचा खासदार बारणेंना पाठिंबा

## कळंबोली येथे पंजाब-हरियाणा निवासी महासभेचे आयोजन : पंजाबी व हरियाणवी बांधवांचा महायुतीला पाठिंबा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंजाब व हरियाणा या राज्यांतून येऊन नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने पनवेल परिसरात स्थायिक झालेल्या पंजाबी व हरियाणवी बांधवांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना आज (रविवारी) पाठिंबा जाहीर केला.

कळंबोली येथे पंजाब-हरियाणा निवासी महासभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात हा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव शिवदास कांबळे, माजी नगरसेवक राजू शर्मा तसेच परेश पाटील, हॅपी



सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हरविंदर सिंग, सितू शर्मा, परमजीत सिंग, निशांत गिल यांच्यासह पंजाबी व हरियाणवी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बरेच पंजाबी व हरियाणवी बांधव वाहतूक व्यवसायात असल्यामुळे खासदार बारणे यांनी त्यांच्या भाषणात रस्त्याशी निगडित उदाहरणे दिली. देशाच्या प्रगतीच्या रस्त्यावरील साठ वर्षातील खड्डे दहा वर्षांत बुजवण्याचे काम पंतप्रधान मोदी यांनी केले, असे ते म्हणाले. जेएनपीटी रस्त्यावर पूर्वी चार-चार तास रांगेत उभे राहावे लागायचे, आता त्या ठिकाणी आठ पदरी रस्ता झाला आहे. मुंबईला जाण्यासाठी समुद्रावर अटल सेतू बांधण्यात आला आहे. पुणे-मुंबई प्रवास अधिक सुखकर व जलद होण्यासाठी मिसिंग लिंकचे कामही अंतिम टप्प्यात आहे. या सर्व प्रकल्पांमुळे केवळ वेळच नाही तर पेट्रोल व डिझेलही वाचणार आहे, याकडे खासदार बारणेंनी लक्ष वेधले. खासदार बारणे यांना तीन लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# समान पाणीपुरवठ्याला परवान्यांचा खो!

## राज्य सरकार तसेच केंद्र सरकारच्या कार्यालयाकडून पाईपलाईनसाठी 'वेट ॲण्ड वॉच' धोरण

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजनेला अडथळ्यांची शर्यत पार पाडावी लागत आहे. शहरातील प्रत्येक भागाला समान पाणीपुरवठा करण्याचे स्वप्न महापालिकेने पुणेकरांना दाखविले आहे. मात्र ही योजनाच पुढे सरकत नसल्याची माहिती समोर आली आहे. या योजनेच्या कामासाठी राज्य सरकार तसेच केंद्र सरकारांच्या कार्यालयातून परवाना मिळण्यात दिरंगाई होत आहे. यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे, परंतु दिल्लीतून परवानगी आणावी लागत असल्याने योजनेच्या कामाला अडथळा आला आहे.

झपाट्याने वाढत असलेल्या पुणे शहराची तहान भागविण्याचे मोठे आव्हान भविष्यात महापालिकेला पेलावे लागणार आहे. नागरिकांना समान पाणी मिळावे, यासाठी समान पाणीपुरवठा योजना महापालिकेने आणली आहे. या योजनेचे काम वेळेत पूर्ण होत नसल्याचे दिसून येत असून गेल्या सहा वर्षात चौथ्यांदा योजनेला मुदतवाढ घेण्याची वेळ पाणीपुरवठा विभागावर आली आहे. त्यासाठी आणखी एक वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाने तयार केला असून तो महापालिका आयुक्तांच्या मंजुरीसाठी पाठवला जाणार आहे, असे मार्च महिन्यात पाणीपुरवठा विभागाने सांगितले होते. मात्र अद्यापही प्रस्ताव पाठवण्यात आला नसून योजनेचे काम आहे त्याच स्थितीमध्ये अर्धवट पडून आहे.

समान पाणीपुरवठा योजना कोविडमुळे लांबली असल्याचे कारण आधी देण्यात आले होते. मात्र त्यानंतर दोन ते तीन वर्षांनीदेखील योजनेच्या कामाला गती मिळाली नसल्याचे स्पष्ट होत आहे. या योजनेअंतर्गत एकूण ८६ पाण्याच्या टाक्या बांधल्या जाणार आहेत. त्यापैकी ५० टाक्या बांधून पूर्ण झाल्या. तर उरलेल्या १६ टाक्यांचे काम अद्याप सुरूच झालेले नाही. हायवे महामार्ग, जलसंपदा विभाग, रेल्वे विभाग, वन विभाग या राज्य आणि केंद्र सरकारच्या कार्यालयाच्या जागेतून जल वाहिन्या टाकण्याचे काम केले जाणार आहे. मात्र या कामासाठी दिल्लीतून परवानगी लागणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कामाची गती वाढवायची म्हटली तरी या परवानगीसाठीची प्रक्रिया वेळ खाऊ असल्याचे काम रखडले आहे. असे असले तरी जलवाहिन्या टाकण्याचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे, असा दावा पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात आला.

समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाईपलाईन बसविल्यानंतर पाणी वापरावर नियंत्रण राहावे. तसेच पाणी वापरानुसार तत्काळ बिल देता यावे, यासाठी नळजोड देताना पाणीमीटर बसविण्यात येत आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना शांत बसण्याशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे समोर आले आहे. पाणीमीटर बसविण्यासाठी महापालिकेकडून सक्ती केली जाणार होती. त्यासाठी पालिकेच्या सुरक्षारक्षकांची मदत घेतली जाणार होती. मात्र सुरक्षारक्षकांसाठी निधीच नसल्याने ही मदत देण्याचे सुरक्षा विभागाने टाळले. सध्या लोकसभा निवडणूक असल्याने पाणीमीटर बसविण्याची कोणावरही सक्ती करता येणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी अप्रत्यक्ष स्पष्ट केले आहे.



### भाजपाचाच देशभरातील महिलांच्या मंगळसूत्रावर डोळा

**» महापालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेमध्ये असणारी ४० टक्के गळती थांबवण्यासाठी आणि पुणेकरांना समान पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेकडून या योजनेचे काम करण्यात येत आहे. ही योजना पुढील ३० वर्षांचा विचार करून आणि शहराची संभाव्य ४९ लाख २१ हजार ६६३ लोकसंख्या विचारात घेऊन आखण्यात आली आहे. या योजनेसाठी अंदाजे २ हजार ८१८ कोटी ४६ लाख रुपये खर्च गृहित धरण्यात आला असून त्याला महापालिकेच्या मुख्य सभेने मे २०१५ मध्ये मंजुरी दिली आहे.**

# कोल्हे आढळराव पुन्हा एकदा आमने-सामने

## दोघे एकमेकांच्या पाया पडले : अमोल कोल्हेंचं शिवाजीराव आढळराव यांच्यासमोर दमदार भाषण

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील विविध लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत विरोधी पक्षांचे उमेदवार आमने सामने येत नसल्याचं चित्र आहे. काही मतदारसंघात विजयासाठी सर्व प्रकारच्या मार्गांचा वापर केला जात असताना शिरुर लोकसभा मतदारसंघात वेगळं चित्र पाहायला मिळतंय. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार अमोल कोल्हे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील पुन्हा आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अमोल कोल्हे यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलं. यावेळी दोन्ही नेते अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्तानं एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अमोल कोल्हे हे शिवाजीराव आढळराव यांच्या पाया पडले. यानंतर शिवाजीराव आढळराव हे देखील अमोल कोल्हे यांच्या पाया पडले.



पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुणे, शिरुर, मावळ, बारामती या मतदारसंघांतील उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रचार सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेच्या पूर्वी शिवाजी आढळराव आणि अमोल कोल्हेंची पुन्हा एकदा भेट घडली. यावेळी आधी कोल्हेनी आढळरावांचे मग आढळरावांनी ही कोल्हेंचे पाय धरले. खेड विधानसभेत अखंड हरिनाम सप्ताहाला दोघे एकाचवेळी पोहचले. यावेळी हा प्रसंग घडला. खासदार अमोल कोल्हे यांनी ज्येष्ठत्व म्हणून पाय धरले असली तरी आढळरावांनी पाय धरण्यामागे त्यांना कोल्हेंचा आलेला पूर्वानुभव तर नसेल ना? अशी चर्चा यानिमित्ताने रंगलेली आहे.

### कोल्हेंचं आढळराव यांच्यासमोर दमदार भाषण

**» खासदार अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव यांच्या समोरचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याची आठवण करून दिली. 2014 मध्ये गॅसचे दर चारशे रुपये होतं, त्या गॅसला नमस्कार करून मतदानाला जा असं मोदी म्हणाले होते. आता तर गॅसचे दर अकराशे बाराशे रुपये झालेत. मग आता तीनवेळा नमस्कार घालून मतदानाला जा. असं म्हणत मोदींच्या जुन्या वक्तव्याची आठवण पुण्यातील सभेदिवशीच कोल्हे यांनी लोकांना आढळरावांसमोर करून दिली. शेतकऱ्यांनी मतदानाला जाताना दिल्लीच्या सीमेवर जीव गमावणाऱ्या शेतकऱ्यांचं स्मरण करावं, ज्यांच्या मुलानं शेतकऱ्यांच्या अंगावर गाड्या घातल्या त्यांचे वडील मोदींच्या मंत्रिमंडळात होते, हे विसरू नका, असं अमोल कोल्हे म्हणाले.**

# थेट संपर्क साधत धंगेकरांचा झंजावात

## संपूर्ण पुणे शहरात 14 जीप यात्रा : पदयात्रा काढून हजारो मतदारांशी थेट संपर्क

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडी (व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर पहिल्या १० दिवसांत संपूर्ण पुणे शहरात १४ जीप यात्रा / पदयात्रा काढून हजारो मतदारांशी थेट संपर्क साधत पहिल्या टप्प्यात प्रचाराचा झंजावात त्यांनी निर्माण केला. प्रत्येक विधानसभा मतदार संघ जीप यात्रा / पदयात्रांद्वारे त्यांनी अक्षरशः पिंजून काढला. त्यामध्ये कसबा – ३, कोथरूड – ३, पर्वती – ३, वडगावशेरी – ३ , आणि पुणे कॅन्टॉन्मेंट व शिवाजीनगर – प्रत्येकी १ अशा जीप यात्रा / पदयात्रांद्वारे त्यांनी सारे मतदार संघ आत्तापर्यंत पिंजून काढले.

काही सकाळी व बहुतांशी संध्याकाळी होणाऱ्या या पदयात्रांचा शुभारंभ शुक्रवार १९ एप्रिल रोजी सकाळी पुण्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपतीचे दर्शन घेऊन पदयात्रांना प्रारंभ झाला. त्यामध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि आम आदमी पार्टी यांचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांच्या सोबत पदयात्रेत सहभागी होत राहिले. पदयात्रांमध्ये प्रमुख पक्षांचे झेंडे डौलाने फडकत राहिले. काँग्रेस पक्षाचे चिन्ह म्हणजे हाताचा पंजा सर्वत्र उंचावले जात होते.

याच परंपरेला साजेशी पदयात्रा रविवार सकाळी पर्वती विधानसभा मतदार संघ व संध्याकाळी शिवाजीनगर मतदार संघात निघाली.ढोल ताशांच्या गजरात 'झिंदाबाद' च्या घोषणांनी दुमदुमत राहिलेल्या पदयात्रांमध्ये उमेदवार आ. रवींद्र धंगेकर हजारो नागरिकांना भेटत राहिले.नागरिकांचा प्रतिसादही उत्साहवर्धक होता. ठिकठिकाणी स्वागत केले जात होते.अनेक दुकांनांमध्ये धंगेकरांना आवर्जून बोलावले जात होते. पर्वती मतदार संघातील अप्पर इंदिरा नगर येथून सकाळी ९.३० वाजता सुरु झालेली पदयात्रा दुपारी ३ पर्यंत चालूच राहिली.

प्रत्येक ठिकाणी औक्षण, सार्वजनिक गणेशउत्सोव मंडळांमध्ये श्री गणेशाची आरती, यामुळे पदयात्रेला विलंब होत राहिलामात्र कार्यकर्त्यांचा व नागरिकांचा उत्साह कमी झाला नव्हता.या पदयात्रेत ॲड. अभय छाजेड, मार्केटयार्ड ब्लॉक अध्यक्ष रमेश सोनकांबळे, पर्वती ब्लॉक अध्यक्ष संतोष पाटोळे,माजी नगरसेवक बंडू नलावडे,भरत सुराणा, स्वप्नील नाईक, प्रथमेश आबनावे, राधिका मखामले,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बाळासाहेब ओसवाल, माजी नगरसेविका दिपाली ओसवाल, सचिन जोगदंड, अमोल रासकर, शशिकांत पापळ, महेश कदम राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष शशिकांत तापकीर, पुणे शहर महिला अध्यक्ष मृणाल वाणी, सचिन पासलकर, सचिन अण्णा तावरे, सोनाली उजागरे, विजू पवार, सौरभ माने, तेजस मिसाळ, विद्या कळेकर आदी सहभागी झाले होते.



### प्रतिस्पर्धी असलेल्या उमेदवाराच्या भागात जाऊन आंदोलन

» प्रकल्पाला विरोध करण्याची भूमिका आमदार धंगेकर यांनी घेतली आहे. या भागातील नागरिकांची मते मिळवण्यासाठी आमदार धंगेकर यांचा हा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. या आंदोलनाबाबत आमदार धंगेकर म्हणाले, हे उद्यान म्हणजे येथील नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने फार मोठी सुविधा आहे. उद्यानाचे सौंदर्य नष्ट करणे म्हणजे लोकांचा श्वास नष्ट करण्यासारखे आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा अधिकाऱ्यांच्या भेटी घेण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांना वेळ दिली गेली नाही. यापुढे आम्ही आणि महाविकास आघाडी या नागरिकांसोबत कायम आहोत. प्रकल्पाला विरोध म्हणून या भागातील नागरिक जनआंदोलन उभे करणार आहेत. त्यामध्येही आम्ही सहभागी होणार आहोत.

### जेष्ठ नागरिक संघातर्फे रवींद्र धंगेकरांचा प्रचार सुरु

» महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे पुणे लोकसभा मतदार संघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांचा प्रचार करण्याचे पुणे शहर काँग्रेस जेष्ठ नागरिक संघातर्फे बैठकीत एकमताने ठरवण्यात आले.त्यानुसार संघटनेचे २००० हुन अधिक जेष्ठ नागरिक घरोघरी प्रचार पत्रके वाटायचे व रवींद्र धंगेकरांना निवडून आणण्याचे आवाहन करीत आहेत. संघटनेचे अध्यक्ष द.स. पोळेकर यांच्या पुढाकाराने ही प्रचार मोहीम सुरु झाली आहे. संघटनेचे कायदा सल्लागार बाळासाहेब बाणखेळे यांनी प्रचाराची रुपरेखा आखली असून या संदर्भात झालेल्या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष व लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख माजी आमदार मोहन जोशी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, रवींद्र धंगेकर यांचा पिंड कार्यकर्त्यांचा आहे. ते जनतेचे नेते आहेत त्यांना मत म्हणजे पुण्याच्या विकासाला मत हे घरोघरी जाऊन सांगावे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले

# अवकाळी पावसामुळे आंबा विक्रीला फटका

## ग्राहकांचा आंबे खरेदीसाठी फारसा प्रतिसाद नाही : अक्षय्य तृतीयेची प्रतीक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

एप्रिल महिना संपायला आला तरी ग्राहकांना आंबे खरेदीसाठी फारसा प्रतिसाद नाही. अवकाळी पावसामुळे या आंबे खरेदीसाठी ग्राहकांचा फारसा प्रतिसाद नसून पावसाळी वातावरणात आंबा खाऊ नये, त्यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात,असा समज आहे. परिणामी एप्रिल महिना संपायला आला तरी आंब्याच्या विक्रीने जोर पकडलेला नाही. आता विक्रेत्यांना अक्षय्य तृतीयेची प्रतीक्षा आहे.

एप्रिल महिना संपायला आला आहे. बाजारात विविध जातीचे आंबे विक्रीसाठी आलेले आहेत. मात्र सध्या सुरू असलेल्या पावसाळी वातावरणामुळे अद्याप आंब्याना मागणी नसल्याचे फळबाजारातील चित्र आहे. आंब्यांमध्ये हापूसचा दर प्रती डझन 800 ते 1200 रुपये आहे.

आंबा सिझनचा विचार करता सुट्यांचा महिना असलेल्या एप्रिलमध्ये दुसऱ्या आठवड्यापासून आंब्याची विक्री जोरात होते. मात्र अवकाळीच्या हजेरीने अपेक्षित संख्येने ग्राहकांकडून आंबा खरेदी होत नसल्याचे चित्र आहे.

येत्या पंधरा दिवसांत आंब्याच्या विविध प्रजाती बाजारात येऊन दर अजून कमी होण्याची शक्यता आहे. अद्याप पायरी, लंगडा या प्रजाती उपलब्ध झालेल्या नाहीत.



### अक्षय्य तृतीयेनंतर विक्री जोर पकडण्याची शक्यता

» केशर, जुनागढ केशर यासह गुजरातमधील केसर, बनराज, दक्षिण भारतातील नीलम, रुमानी आंब्याची प्रतीक्षा कायम आहे. हापूसच्या तुलनेत हे आंबे मोठे असतात. दरवर्षी या आंब्यांनादेखील चांगली मागणी असते. व्यापाऱ्यांच्या मते, अक्षय्य तृतीयेनंतर आंब्याची विक्री अधिक जोर पकडण्याची शक्यता आहे.

# मुळशी धरणातून पाण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा

## पुणेकरांना शुद्ध, पुरेसा आणि चोवीस तास पाणीपुरवठा : भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यासाठी स्वतंत्र धरणे बांधणे सध्या अशक्य आहे. त्यामुळे मुळशीतून पुण्यासाठी पाच टीएमसी पाणी मिळावे, त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार आहोत, असे आश्वासन पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी येथे दिले.



वडगावशेरी विधानसभा मतदारसंघात मोहोळ यांच्या प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार सुनील टिंगरे, माजी आमदार जगदीश मुळीक, बापूसाहेब पठारे, माजी नगरसेवक योगेश मुळीक, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या योजनेतील 82 पैकी 51 टाक्यांचे काम पूर्ण झाले असून, 20 टाक्यांचा वापर सुरू झाला आहे. बाराशेपैकी 921 किलोमीटरच्या जलवाहिन्या टाकण्यात आल्या असून, वितरण वाहिन्यांचे काम 80 टक्के पूर्ण झाले आहे. पन्नास टक्क्यांहून अधिक पाण्याचे मीटर्स बसविण्यात आले आहेत. या योजनेमुळे पाण्याची गळती कमी होणार असून, पुणेकरांना शुद्ध, पुरेसा आणि चोवीस तास पाणीपुरवठा होऊ शकेल असा विश्वास वाटतो.

नगर रस्ता, येरवडा, लोहगाव, धानोरी, कल्याणीनगर, वडगावशेरी, खराडी, संगमवाडी या परिसरातील पाणीटंचाई दूर करण्याच्या दृष्टीने भामा-आसखेड धरणातून पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यात आली. या धरणातून 2.8 टीएमसी पाणी उपलब्ध होत आहे. 2041 च्या लोकसंख्येचा विचार करून या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे, असेही मोहोळ यांनी सांगितले.

योजनेंतर्गत मंजूर कामांबाबत टाटा पॉवर कंपनीने हरकत घेतल्याने काम थांबले होते. या कामांना वेग देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलसंपदा विभागास प्रस्ताव द्यावा. जलसंपदा विभागाने आवश्यक पाण्याचे आरक्षण जाहीर करून याबाबत टाटा पॉवर कंपनीला लेखी कळवावे. तसेच पौड येथील पाणीपुरवठा योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी 'पीएमआरडीए'ने एक एकर जागा उपलब्ध करून दिली आहे.

धरणातून उपलब्ध होण्याच्या दृष्टीने टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी सकारात्मक असल्याचे सांगून की, मुळशी आणि पुणे परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविल्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते. यासह धरणाच्या मृतसाठ्यामधील पाण्याचा वापर करता आल्यास पाण्याची वाढीव मागणी पूर्ण होईल. टाटा पॉवर कंपनीच्या सहकार्याने या कामास प्राधान्य देण्यात यावे.

कोळवण खोऱ्यातील गावांमध्ये येत्या तीन वर्षात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाणीपुरवठा योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी. त्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविण्यात यावी. उंची वाढविल्यामुळे पाण्याखाली जाणाऱ्या जमिनीपैकी 80 टक्के जमीन टाटा पॉवर कंपनीच्या क्षेत्रातील असून ती विनामोबदला देण्याची विनंती करण्यात यावी.

### दिलेला शब्द आम्ही पाळला

**» मोहोळ म्हणाले, "मी महापौर असताना 22 सप्टेंबर 2021 रोजी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे. हे धरण टाटा कंपनीचे आहे. कंपनीकडून पाणी मिळविण्यासाठी प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. तसेच समान पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्याचा दिलेला शब्द आम्ही पाळला आहे.**

# पुणे तापले! उन्हाळ्यात कमाल तापमानाचा उच्चांक

## शहरात 41.3 अंश सेल्सिअस कमाल तापमान : यंदाच्या उन्हाळ्यात कमाल तापमानाचा उच्चांक

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील शिवाजीनगर येथे यंदाच्या उन्हाळ्यात कमाल तापमानाचा रविवारी उच्चांक झाला. शहरात ४१.३ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले.



पुण्यातील शिवाजीनगर येथे यंदाच्या उन्हाळ्यात कमाल तापमानाचा रविवारी उच्चांक झाला. शहरात ४१.३ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. तळेगाव ढमढेरे येथे ४३.४ आणि कोरेगाव पार्क येथे ४३.३ कमाल तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवसांमध्ये कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढेल, असा अंदाजही हवामान खात्यातर्फे शनिवारी वर्तविण्यात आला.

शहरात सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका लागत होता. दुपारी ११ वाजल्यानंतर उन्हाच्या चटक्याची तीव्रता वाढली. दुपारी चारपर्यंत उन्हाचा भयंकर चटका जाणवत होता. रविवार सुटीच्या दिवशी रस्त्यावर वाहतूक कमी होती.पण, इतर रविवारी जाणवणारी तुरळक गर्दीची दुपारी १२ ते तीन या वेळेत जाणवत नव्हती. कामाच्या निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांनी टोपी, गॉगल घातला होता. पूर्ण चेहरा झाकून घेऊन दुचाकीवरून प्रवास करणारे प्रवासी दिसत होते.

रस्त्यावर ठिकठिकाणी शीतपेये विक्रेत्यांच्या दुकानावर नागरिकांनी गर्दी केल्याचेही चित्र शहरात रविवारी दिसले. पुणे शहरात यंदाच्या उन्हाळ्यात गुरुवारी (ता. १८) आतापर्यंतचे सर्वाधिक म्हणजे ४१ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले होते.

अवघ्या दहा दिवसांमध्ये ढगाळ वातावरण आणि पाऊस पडल्याने कमाल तापमान शनिवारपर्यंत (ता. २०) ३७.८ अंश सेल्सिअसपर्यंत कमी झाले होते. त्यानंतर पुन्हा कमाल तापमानाचा पारा वाढून आता ४० अंश सेल्सिअसच्या वर उसळी मारली आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील कमाल तापमान चाळिशी पार जाण्याचा आजचा पाचवा दिवस ठरला.

शहरात गेल्या वर्षी फक्त एक दिवस कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस नोंदले गेले होते. त्यापूर्वी म्हणजे २०२२ मध्ये सात दिवस कमाल तापमानाच्या पाऱ्याने चाळिशी ओलांडली होती. त्या वर्षी २८ एप्रिलला ४१.८ अंश सेल्सिअस इतके उच्चांकी कमाल तापमान नोंदले होते. त्यानंतर बरोबर दोन वर्षांमधला रविवारी दुसरा उच्चांक नोंदला गेला. पुण्यात फारसा पाऊस पडला नसल्याने माती कोरडी आहे.

### उन्हाचा चटका वाढणार

**» पुणे शहरात पुढील दोन दिवसांमध्ये सोमवारी (ता. २९) कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस नोंदले जाईल. तर, त्यानंतर एप्रिलच्या शेवटी मंगळवारी (ता. ३०) आणि मेच्या सुरुवातीला बुधवारी (ता. १) ४२ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान वाढेल. त्यानंतर दोन ते चार मे या दरम्यान आकाश निरभ्र राहण्याची शक्यता असल्याने कमाल तापमानाचा पारा ४३ अंश सेल्सिअसपर्यंत वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे पुणेकरांनो या आठवड्यात उन्हाच्या वेळा सोडून घराबाहेर पडा. प्रतिचक्रवातामुळे गुजरातवरून गरम वारे महाराष्ट्राच्या दिशेने वहात आहेत. कोकणात त्याचा सर्वाधिक प्रभाव आहे. तसेच, पुण्यासह मध्य महाराष्ट्राच्या कमाल तापमानात त्यामुळे वाढ झाली आहे.**